# ANNEXURE E

## SIMLA HOUSE CHSL DDR 79A NOC

-: महाराष्ट्र शासन :-

# उपनिबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई


मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी. पी. ओ. समोर, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

ई-मेल: mumbaidward@gmail.com दुरध्वनी क्र. ०२२-२२६१८४७१


जा.क्र.मुंबई/उपनि/डी विभाग/पुनर्वि.परवानगी आदेश/ ९८६२/२०२५ दिनांक- २८/०१/२०२५.

वाचावे- १) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय सगृयो२०१८/प्र.क्र.८५/१४-स, दि.०४/०७/२०१९

२) सिमला हाऊस को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., ५१/बी, नेपियन्सी रोड, मलबार हिल, मुंबई-४०००२६ या संस्थेचा दि.११/१२/२०२४ रोजीचा प्रस्ताव.

३) कार्यालयाचे दि.०९/०१/२०२५ रोजीचे पत्र.

४) प्राधिकृत अधिकारी यांचा दि. २०/०१/२०२५ रोजीचा अहवाल.

ज्याअर्थी, सिमला हाऊस को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., ५१/बी, नेपियन्सी रोड, मलबार हिल, मुंबई-४०००२६ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून सदर नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येत आहे. आणि,

ज्याअर्थी, वाचावे क्र.१ नुसार प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(अ) अन्वये निर्देशानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीचा पुर्नविकास करणेसाठी विकासकाची निवड करण्याबाबत आयोजित करावयाच्या विशेष सर्वसाधारण सभेस प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्याचे अधिकार निबंधकांना प्रदान केलेले आहेत. आणि,

ज्याअर्थी, विकासकाच्या नियुक्तीसाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्याकरिता प्राधिकृत अधिका-याची नियुक्ती करणेबाबत संस्थेने वाचावे क्र.२ अन्वये कार्यालयात प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील वाचावे क्र.३ अन्वये सदर सभेस उपस्थित राहणेकरिता श्री.जे.डब्ल्यु.चव्हाण, सहकारी अधिकारी श्रेणी-१ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. आणि,

ज्याअर्थी, सदर नियुक्ती आदेशास अनुसरुन या कार्यालयातील नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांचे उपस्थितीत संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात आलेली आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी दि.१२/०१/२०२५ रोजी सदर सभेत झालेल्या निर्णयाबाबतचा अहवाल या कार्यालयास वाचावे क्र.४ अन्वये दि २०/०१/२०२५ रोजी सादर केलेला आहे. आणि,

ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयास सादर केलेला अहवालाचे अवलोकन केले असता, संस्थेच्या झालेल्या विकासक निवडीच्या विशेष सर्वसाधारण सभेस संस्थेचे एकुण २४६ सभसदांपैकी विशेष सर्व साधारण सभेत २०३ सभासद प्रत्यक्ष उपस्थित होते. पुर्नविकासासाठीच्या विशेष सर्वसाधारण सभेस आवश्यक असलेली २/३ गणपूर्ती पूर्ण झालेली असल्यामुळे सभा घेण्यात आलेली आहे. सभेस उपस्थित सर्व सभासदांनी हात उंचावून विकासक निवडीला संमती दर्शविली. तसेच सभासदांनी लेखी संमती पत्र दिले. अशाप्रकारे विकासक निवडीबाबतचा ठराव उपस्थित २०३ सभासदांपैकी १९६ सभासदांनी लेखी संमतीने म्हणजेच ५१% पेक्षा अधिक सभासदांच्या संमतीने मंजूर झालेला आहे. सदर ठरावात विकासक केस्टोन रीयलटोर्स लि.,(KEYSTONE REALTORS LIMITED (RUSTOMJEE)) यांची बहुमताने निवड झालेली आहे. आणि,

त्याअर्थी, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सर्व प्रक्रीयेचे अवलोकन केले असता व अवलंबिलेल्या पद्धतीचा विचार करता, संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकासक म्हणून केस्टोन रीयलटोर्स लि.,(KEYSTONE REALTORS LIMITED (RUSTOMJEE)) यांची निवड झालेली आहे. सदर नियुक्तीस मान्यता देणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्यामुळे मला प्राप्त अधिकारानुसार मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## -: आ दे श :-

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(अ) व सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय सगृयो २०१८/प्र.क्र.८५/१४-स, दि.०४/०७/२०१९ चे शासन निर्णयान्वये प्राप्त अधिकारानुसार मी राजेश लव्हेकर, उपनिबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई याद्वारे **सिमला हाऊस को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., ५१/बी, नेपियन्सी रोड, मलबार हिल, मुंबई-४०००२६** या संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी परवानगी देत असुन विकासक म्हणून केस्टोन रीयलटोर्स लि.,(KEYSTONE REALTORS LIMITED (RUSTOMJEE) यांची विशेष सर्वसाधारण सभेत निवड झालेली असल्याने सदर नियुक्तीस मान्यता देत आहे.

सदर आदेश आज दिनांक २८/०१/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR, C.S. (D-WARD) उपनिबंधक सहकारी संस्था (डी-वार्ड) मुंबई MUMBAI

**(राजेश लव्हेकर)**
उपनिबंधक,
सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई.

ठिकाण- मुंबई
दिनांक- २८/०१/२०२५.

प्रति,

१) चेअरमन / सेक्रेटरी, **सिमला हाऊस को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., ५१/बी, नेपियन्सी रोड, मलबार हिल, मुंबई-४०००२६**

२) **केस्टोन रीयलटोर्स लि.,**(KEYSTONE REALTORS LIMITED (RUSTOMJEE)

उपनिबंधक,
सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई.

**प्रत-माहितीसाठी.**
मा.कार्यकारी अभियंता, इमारत व कारखाना विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, डी विभाग, जोबनपुत्र कंपाऊंड, नाना चौक, मुंबई-४००००७.